आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८ वा. ५ मिनीटांनी

४ ऑक्टोबर २०२३ – बुधवार

## ठळक बातम्या

- प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात १०० रुपयांची वाढ करण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय

- यंदाचं रसायनशास्त्रासाठीचं नोबेल पारितोषिक क्वांटम डॉट्सच्या शोधाबद्दल तीन शास्त्रज्ञांना जाहीर

- दोन शासकीय रुग्णालयांमधे मोठ्या प्रमाणात रुग्णांचे मृत्यू झाल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाची महाराष्ट्र शासनाला नोटीस

- एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा’ उद्यापासून भारतात सुरु

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची आज तीन सुवर्णपदकांची कमाई

**आणि**

- नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास उद्यापासून सुरू होण्याची शक्यता

**<><><><><><>**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात 100 रुपयांची वाढ करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात

आला. केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहरांना ही माहिती दिली.

आजच्या बैठकीत आंतरराज्य नदी विवाद कायदा 1956 अंतर्गत तेंलगणा आणि आंध्र प्रदेश यांच्यातल्या कृष्णा पाणी विवाद न्यायाधिकरण-२ मधल्या संदर्भ अटींना मान्यता देण्यात आली. त्याच बरोबर तेलंगणा इथं सम्मक्का सरक्का केंद्रीय आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी केंद्रीय विद्यपीठ कायदा 2009 मध्ये बदल करायलाही मान्यता दिली.

राष्ट्रीय हळद मंडळ स्थापन करायला मंजुरी देण्यात आली, अशी माहिती केंद्रीय संस्कृती आणि पर्यटनमंत्री जी किशन रेड्डी यांनी दिली. या मंडळामुळे हळदीचं आहारतलं महत्त्वं या संदर्भात जागरुकता निर्माण करायला, तसंच हळदीची निर्यात करायलाही मदत मिळेल, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

यंदाचं रसायनशास्त्रासाठीचं नोबेल पारितोषिक क्वांटम डॉट्सच्या शोधाबद्दल तीन शास्त्रज्ञांना देण्यात आलं आहे. फ्रेंच अमेरिकन शास्त्रज्ञ मौंगी जी बावेनडी, अमेरिकन शास्त्रज्ञ लुईस ई ब्रूस आणि जन्माने रशियन असलेले अलेक्क्सई एकिमोव अशी त्यांची नावे असून त्यांच्या शोधाचा वापर led टीव्ही आणि led बल्ब यामध्ये होणार आहे.चित्ताकर्षक रंगनिर्मितीसाठी या सूक्ष्मतम क्वांटम डॉट्सचा उपयोग होणार आहे. शल्यविशारदांना याचा फायदा होणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या दोन शासकीय रुग्णालयांमधे मोठ्या प्रमाणावर रुग्णांचे मृत्यू झाल्याच्या घटनेची स्वतःहून दखल घेत मुंबई उच्च न्यायालयानं राज्य शासनाला नोटीस बजावली आहे.

सरकारी रुग्णालयांसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीचा तपशील उद्या सादर करण्याचे निर्देश न्यायालयानं महाअधिवक्ता वीरेंद्र सराफ यांना दिले आहेत. या प्रकरणी न्यायालयानं आपणहून दखल घ्यावी, अशी मागणी करणारा अर्ज मोहित खन्ना या वकिलानं आज दाखल केला होता. रुग्णालयातली पदांची स्थिती, औषधं, आणि शासकीय खर्च याची तपशीलवार माहिती घेऊन नंतर रीतसर याचिका दाखल करावी, असं न्यायालयानं खन्ना यांना सांगितलं.

<><><><><>

नांदेड इथं  शासकीय रुग्णालयात झालेल्या प्रकारासंदर्भात हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील यांच्याविरोधात नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पाटील यांनी नांदेडच्या शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. आर. वाकोडे यांना स्वच्छतागृह साफ करायला लावल्याचा काल व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाला. या घटनेनंतर अनेक सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर संघटना आदींनी पाटील यांचा निषेध केला. याची दखल घेऊन नांदेड ग्रामीण पोलिसांनी खासदार हेमंत पाटील यांच्यावर ॲट्रॉसिटीसह शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केली. सुधारित यादीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद दिलं आहे. अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील असतील, तर सोलापूर आणि अमरावती जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोपवलं आहे. भंडारा- विजयकुमार गावित, तर बुलडाणा- दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ- कोल्हापूर, धर्मराव बाबा आत्राम- गोंदिया, धनंजय मुंडे- बीड, संजय बनसोडे- परभणी, अनिल पाटील- नंदुरबार, तर सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे वर्धा जिल्ह्याचं पालकमंत्रीपद दिलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दुपारी मध्य प्रदेशातल्या जबलपूरला भेट देणार आहेत. यावेळी ते सुमारे १२ हजार ६०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विकास प्रकल्पांचं लोकार्पण करतील. मुंबई- नागपूर- झारसुगुडा या ३१७ किलोमीटर लांबीच्या पाईपलाईन प्रकल्पाच्या नागपूर- जबलपूर विभागाची पायाभरणीही मोदी यावेळी करणार आहेत. या प्रकल्पावर सुमारे अकराशे कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

<><><><><>

'आयसीसी -एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा' उद्यापासून भारतात सुरु होत आहे. पहिला सामना उद्या अहमदाबाद इथं इंग्लड आणि न्यूझीलंड याच्यात होणार आहे.

याआधी यजमानपदी असताना भारतानं २०११ मध्ये विश्वचषक जिंकला होता. कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली यंदाही भारतीय संघ उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास क्रिकेट विश्लेषकांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

चीन इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला आतापर्यंत 81 पदकं मिळाली आहेत. यात 17 सुवर्ण, 31 रौप्य आणि 33 कांस्य पदकांचा समावेश आहे. या पदकां बरोबरंच भारत चौथ्या स्थानावर आला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतली भारताची उत्कृष्ट कामगिरी आहे. आज 11 व्या दिवशी भारताची कामगिरी कौतुकास्पद होती. आज भारताला एकूण 12 पदकं मिळाली. तिरंदाजीत ज्योती सुरे टचखा वेण्णम आणि ओजस देवतळेनं कंपाउंड मिक्स प्रकारात  दक्षिण अफ्रिकेला 159-158 नं नमवत सुवर्ण पदक जिंकलं. भालाफेकीत नीरज चोप्रानं 88 पूर्णांक 88 शतांश मीटर लांब भाला फेकत सुवर्ण पदक पटकावलं, तर किशोर जेनाला रौप्य पदक मिळालं.  मुश्टीयुद्धात 75 किलो वजनी गटात लवलीना बोर्गोहेनला रौप्य, तर परवीन हुडाला 57 किलो वजनी गटात कांस्य पदक मिळालं. स्कॉश मध्ये अभय सिंग आणि अनाहत सिंग या मिश्र जोडीनं उपांत्य सामन्यात हाँगकाँगच्या जोडीला नमवत कांस्य पदक जिंकलं. आज सुरवातीला चालण्याच्या 35 किलोमिटर मिश्र शर्यतीत राम बाबू आणि मंजू राणीनं कांस्य पदक जिंकून चांगली सुरवात केली.   महिलांच्या 800

मीटर धावण्याच्या स्पर्धेत हरमिलन बैसला रौप्य आणि पुरुषांच्या 5 हजार मीटर स्पर्धेत अविनाश साबळेला रौप्य पदक मिळालं. 4 बाय 400 मीटर रिले स्पर्धेत भारतीय पुरुष संघाला सुवर्ण, तर महिला संघाल रौप्य पदक मिळालं. कुस्ती स्पर्धेत 87 किलो वजनी गटात सुनील कुमारनं किर्गीस्तानच्या अताबेक अझिस्पेकोवला 2-1 नं नमवत कास्य पदक पटकावलं.

<><><><><>

नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून माघार घेण्याचा प्रवास उद्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातून उद्या मान्सून माघार घेईल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मंगळवारपर्यंत संपूर्ण राज्यातून मान्सून बाहेर पडेल, असा अंदाज आहे. जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेशचा काही भाग, मध्य प्रदेशचा उत्तर भाग यातून आतापर्यंत मान्सून माघारी फिरला आहे.

<><><><><>

रिझर्व बँकेच्या वित्त आणि पतधोरण आढावा समितीची बैठक आज मुंबईत सुरु झाली. या वर्षीचा द्वैवार्षिक वित्त आणि पत धोरण आढावा रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता जाहीर करतील, आणि नंतर पत्रकारपरिषद घेतील. गेल्या आढाव्यात व्याजदरांमधे कोणताही बदल रिझर्व बँकेनं केला नव्हता.

सध्या रेपो दर साडेसहा टक्के तर रिव्हर्स रेपो दर तीन पूर्णांक ३५ शतांश टक्के आहे.

**<><><><><>**

संरक्षणाच्या बाबतीत स्वयंसिद्ध होण्याचा भारत हरप्रकारे प्रयत्न करत असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं.भारतीय नौदलाच्या एनआयआयओ स्वावलंबन परिषदेत ते आज बोलत होते. देशाच्या नेतृत्वाची धुरा नरेंद्र मोदी यांनी सांभाळल्यापासून केंद्र सरकार स्वयंसिद्ध होण्याला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचं ते म्हणाले. सरकारनं आखलेल्या योजनांमुळे संरक्षण क्षेत्रात संशोधन आणि विकास याबाबतीत देश प्रगतीपथावर गेल्याचं ते म्हणाले.

//<><><><><>//